# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - गीत जीवनाचे
- कवी / कवयित्रीचे नाव :- पूजा बागवे

संगीत जन्मले कधी, ठावे नसे मलाहि
ब्रह्मांडी आकाशगंगा, ओंकार आळविती
पाहून अगम्य सारे, पुन्हा जाणीव होई
गाण्याविना जगी या, जगण्यास अर्थ नाही ॥१॥

गाण्यात चंद्र सुद्धा, पहा सुरेख होई
निंबोणी च्या कुशी, अलगद झोप घेई
पुन्हा आज अंगाई, तान्हयास निजवु पाही
गाण्याविना जगी या, जगण्यास अर्थ नाही ॥२॥

भजनात अमृताच्या, मन पांडुरंग पाही
शब्द अन सूर, विठू याच डोळा वाही
चंद्रभागा तिर, जीव आसमंत होई
गाण्याविना जगी या, जगण्यास अर्थ नाही ॥३॥

तारुण्य उमलताना, गाणी मनी फुलावी
नवं भावना मनीची, तालात खुलून यावी
तो नभिचा चंद्र, चैत्र यामिनी असावी
गाण्याविना जगी या, जगण्यास अर्थ नाही ॥४॥

विरहात साथ पुन्हा, लाभे ती गाण्याची
आसवांची तीव्रता, संगीत शमवू पाही
दुःख सारे मनीचे ,असेच विरून जाई
गाण्याविना जगी या, जगण्यास अर्थ नाही ॥५॥

सागराची शांतता, अन भव्यता पर्वताची
नदीची आर्तता, अन भव्यता ईश्वराची

Arihat Music Therapy

‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

जणू माझे शब्द मन हे, एक तराणे गाई
गाण्याविना जगी या, जगण्यास अर्थ नाही ॥६॥

Anahat Music Therapy